# सर्वसाधारण अभ्यागत व कार्यालयासाठी सर्वसाधारण नियम

१) कार्यालयात प्रवेश करणाऱ्यासाठी निवारा केंद्र संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अपॉइंटमेंट घ्यावी.

२) विना अपॉइंटमेंट कोणालाही निवारा केंद्रामध्ये प्रवेश मिळणार नाही. एका वेळी फक्त एका व्यक्तिलाच प्रवेश मिळेल.

३) आपल्या स्मार्टफोन मध्ये "आरोग्य सेतु" ॲप स्थापित (इंस्टॉल) असावे.

४) करोना प्रतिबंधित क्षेत्रातील अर्जदारांना निवारा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. त्यांनी आपल्या लॉटरी संदर्भातील समस्येकरिता कॉल सेंटरला फोन करावा.

५) कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक कर्मचारी-अधिकारी आणि कामानिमित्त येणाऱ्या प्रत्येकाचे थर्मल-इन्फ्रारेड थर्मामीटरने स्क्रिनिंग करणे बंधनकारक आहे.

६) हवा खेळती राहण्यासाठी दार-खिडक्या उघडी ठेवावी.

७) सर्व कर्मचाऱ्यांनी तीन पदरी असलेल्या मास्कचा वापर करणे बंधनकारक.

८) तोंडाला आणि नाकाला सतत हात लावणे टाळावे.

९) खोकला-सर्दी झालेली असेल तर टीश्यू पेपर, स्वच्छ धुतलेल्या रूमालाचा वापर करावा.

१०) कार्यालयात दोन कर्मचाऱ्यांमध्ये किमान सहा फुटाचे अंतर राखणे बंधनकारक.

११) अभ्यागत अर्थात कामानिमित्त येणाऱ्या व्यक्तीने मास्क वापरणे बंधनकारक आहे तसेच निवारा केंद्रात प्रवेश करताना सोबत कोणतेही कागदपत्रे किंवा पिशवी/बॅग आणू नये.

१२) कार्यालयाच्या प्रत्येक प्रवेशद्वारावर सॅनिटायझरची व्यवस्था करणे.

१३) लिफ्ट, बेल, बटन, टेबल-खुर्ची आणि इतर उपकरणे दिवसातून तीन वेळा 2 टक्के सोडियम हायपोक्लोराईटने स्वच्छ पुसून घ्यावीत.

१४) कॉम्प्युटर, प्रिंटर, स्कॅनर दिवसातून दोन वेळा अल्कोहल मिश्रीत सॅनिटायझरने पुसून घ्यावे. कार्यालय साबण व पाण्याने धुवून घेणे

वरील सुचनांचे उल्लंघन करणाऱ्यावर आपत्कालीन व्यवस्थापन कायदाचे कलम ५१ ते ६० व भारतीय दंड संहिताचे कलम १८८ अंतर्गत कारवाई करण्यात येईल.